आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in




# दैनिक लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com
मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,
RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक १५० वा ● मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## माजलगावात दिव्यांग मतदार जनजागृती रॅली

माजलगाव (प्रतिनिधी) : मतदान हा सर्वांचा हक्क असुन सर्वांनी मतदान करावे,यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व निवडणुक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांच्या सुचनेनुसार तालुका दिव्यांग कक्षाच्या वतीने आज



दि.११नोव्हेंबर २०२४ रोजी दिव्यांग मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅली उद्घाटन तहसिलदार संतोष रूईकर यांनी हिरवा ध्वज दाखवुन केले.यावेळी दिव्यांग बांधवांचा सत्कार तहसिलदारांच्या हस्ते करण्यात आला.या रॅलीमध्ये मूक – बधिर निवासी विद्यालय माजलगावचे मुख्याध्यापक थळपती,मतिमंद निवासी विद्यालयाचे मुख्याध्यापक विजय राठोड,मुख्याध्यापक शेख शमी,राहुल पवार यांचेसह तालुक्यातील सर्व दिव्यांग शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी या दिव्यांग मतदार जनजागृती रॅलीत सहभाग घेतला होता.

## झरोका

एक – अहो, मुख्यमंत्री पदाचे काय घेवून बसलात, तूमची ती कुठे आहे, ती भासणात आहे, हे कळत नाही, मग काय बोलता हे कळत नाही. डोकं बधीर झालं आहे.

दुसरा – अरे, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी अमित देशमूख यांना भावी मुख्यमंत्री म्हणले हे तूला कळत नाही काय, त्यामूळे गडीवरचा राजा महाराष्ट्राच्या खुर्चीवर बसत असेल तर तूला काय अवघड वाटते. आणि तू असा कसा काय बोलतो आहेस. हे कांही कळत नाही.

एक – अरे बाबा, महाराष्ट्रा मध्ये महायुती मध्ये भाजपा आणि बंडखोर शिवसेना, राष्ट्रवादीचे आमदार, मंत्री कार्यरत आ–हेत. त्या विरोधात महाविकास आघाडीच्या माध्यमातून कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, ठाकरे सेना, विधानसभा निवडणूकी मध्ये कार्यरत असताना अमित देशमूख हा मुख्यमंत्री कसा काय होवू शकतो.

दुसरा – अरे, राजकीय सत्ताकारणा मध्ये प्रत्येक आमदार मुख्यमंत्री पदाची आस धरुण कार्यरत राहातो. महायुती मध्ये आजघडीला एकनाथ शिंदे, उद्याचे मुख्यमंत्री असले तरी अमित शहा यांनी देवेंद्र फडणवीस यांना पुढे केल्यामूळे अजित पवारांचा पत्ता कट झाला. त्यातून उद्याला महाविकास आघाडी सत्तेवर आली तर उध्दव ठाकरे ऐवजी पृथ्वीराज चव्हाण किंवा सुप्रिया सुळे पवार का येवू शकत नाहीत. अशी कुजबूज होताना दिसते आहे. त्यामूळे तूझ्या पोटात दुखण्याचे कारण काय, असे मला वाटते.

एक – अहो तसे कांही नसतं, सत्ताकारणाच्या बेरजे मधून जो कोणी पुढे येतो त्याचीच सर होत असते, त्यामुळे कांही जरी घडलं तरी महाविकास आघाडी शिवाय पर्याय नसावा परंतू उद्याचे भवितव्य कोलदांडा टाकून उद्याचा वारसदार कोण आहे, अशी शरद पवार यांनी गुगली टाकल्यामूळे सुप्रिया सुळे की, अजित पवार हे सांगणे कठीण दिसते, त्यामूळे डोकं ठणंठणंत आहे, म्हणून बोलतो आहे.

## तोलामोलाच्या राजकारणातून डॉ. अर्चनाताईची आगेकूच !

लातूर (दैलाप्रप्र) : जेष्ठ कॉंग्रेस नेते, लोकसभा अध्यक्ष तथा केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या ष्णूशा डॉ. अर्चनाताई शैलेश पाटील चाकूरकर या लातूर शहर विधानसभा निवडणूकीत भाजपा पुरस्कृत महायुतीच्या वतीने निवडणूक रिंगणात आहेत. त्यांचे प्रतिस्पर्धी माजी मुख्यमंत्री तथा केंद्रीय ग्रामविकास मंत्री दिवंगत विलासराव देशमूख यांचे सुपूत्र अमित देशमूख हे निवडणूक रिंगणात आपापले भवितव्य आजमावित आहेत, त्यामूळे मतदारा मध्ये मतदान कोणाला करावे आसा संभ्रम निर्माण झाल्याचे दिसत आहे.




माजी मंत्री अमित देशमूख आणि डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांची वंशावळी कॉंग्रेशी आहे, अख्खी खानदान कॉंग्रेशी आहे, परंतू आजच ते अमित देशमूख कॉंग्रेसच्यास वतीने तर डॉ. अर्चनाताई पाटील या भाजपाच्या वतीने निवडणूक रिंगणात असल्यामूळे भाजपाचा कोण, आणि कॉंग्रेसचा कोण असा संभ्रम निर्माण झाल्यामूळे तूला ना मला, घाल कुत्र्याला, अशीच अवस्था होती की काय, अशीच कुजबूज सर्वत्र होताना दिसते आहे.

## देशमूखांच्या फेरी मध्ये चाकूरकरांची दांडी यात्रा

लातूर : विलासराव देशमूख यांच्या नावावर सत्ताकारण करणाऱ्या माजी मंत्री अमित देशमूख यांनी लातूर शहरा मध्ये गंजगोलाईच्या पुर्व भागा मध्ये प्रभाग १,२,३,७ या प्रभागात सिध्देश्वर मंदीरा पासून प्रभाग फेरी केली. परंतू कॉंग्रेसचेच शिवराज पाटील चाकूर यांच्या सूनबाई डॉ. अर्चनाताई पाटील यांनी आंबेडकर चौकातील विलास नगर या मांग गारुडी या वस्ती मधून म.गांधी यांच्या नांवाने दांडी यात्रा काढून पूर्वभागातील जनतेला सावध करुन मी तूमची मूलगी आहे, मला आश्रय द्या, असे आव्हाण करुन जनतेला मतदानाची हाक दिली. तर उलटपक्षी कॉंग्रेसचे युवराज अमित देशमूख यांनी मीच तुमचा कर्ता, धर्ता आहे, त्यामूळे मलाच मतदान करुन विजयी करावे असे आव्हाण केले असताना विवेकानंद चौक परीसरातील यशवंत शाळेच्या बाजूला असलेल्या विलास नगर मधील वस्तीच्या नागरीकांची काय अवस्था आहे, असा रोखठोक सवाल भाजपाचे अधिकृत उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी अमित देशमूख याना विचारल्यामूळे ते समोरा समोर असताना त्यांनी काढता पाय घेतला यावरुणच उद्याचा निकाल काय तो स्पष्ट होताना दिसतो आहे अशीच कुजबूज मतदारात होताना दिसते आहे.

## न्याय प्राधिकरण संस्थेवर न्यायमुर्ती भुषण गवई यांची नियुक्ती !

लातूर (दैलाप्रप्र) : भारतीय सत्ताकारणातील न्याय संस्थेला अनन्य साधारण महत्व असते, त्यात दलित, बहुजन, वंचित, उपेक्षितांना न्याय मिळत नसतो. त्यामूळे सर्वोच्च न्यायालयाने देशभरातील राज्य, जिल्हा, तालूकास्तरावर न्याय प्राधिकरण सेवा उपलब्ध करुन दिली. परंतू त्या माध्यमातून जनजागरण न झाल्यामूळे महिला, पुरुषानां हवा तसा न्याय मिळत नव्हता. परंतू याचे गांभीर्य लक्षात घेवून मावळते सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी भारतीय प्राधिकरण न्याय संस्थेच्या कार्यकारी संचालक पदी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती भुषण गवई यांची नियुक्ती केल्यामूळे सर्वत्र समाधान व्यक्त होताना दिसते आहे.



सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती असताना भुषण गवई यांनी जातीय राजकारणाला बाजूला ठेवून न्याय निवाडा केला गेला. त्यामूळे भुषण गवई हे सामाजीक न्याय प्राधिकरण सेवा केंद्रा मध्ये योग्य ते न्याय निवाडा करु शकतात, असा विश्वास पटल्यामूळे प्रधान मंत्री नरेंद्र मोदी आणि मावळते सर्वोच्च न्यायलयाचे सर न्यायाधिश धनंजय चंद्रचूड यांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती भुषण गवई यांना सन्मान पुर्वक न्याय प्राधिकरणाचा अधिकार दिला हे विशेष महत्वाचे वाटते. न्याय मुर्ती भुषण गवई हे आंबेडकरी चळवळीतील रिपब्लिकन पक्षाचे रा.सू.गवई यांचे सुपूत्र असून त्यांचाच ठसा संविधानात्मक न्याय संस्थेवर ठसा उमटेल अशीच अपेक्षा सर्वत्र व्यक्त होताना दिसते आहे.

## व्हिडीओ चित्रीकरण पथकांनी खर्चाच्या बाबींना केंद्रस्थानी ठेवून चित्रीकरण करावे - निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार

लातूर, : व्हिडीओ चित्रीकरण पथकांनी राजकीय प्रचार सभा, कार्यक्रमांचे चित्रीकरण करताना खर्चाच्या बाबी केंद्रस्थानी ठेवून चित्रीकरण करावे, अशा सूचना निवडणूक खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी दिल्या. लातूर शहर, लातूर ग्रामीण व अहमदपूर विधानसभा मतदारसंघातील खर्च पथकांच्या बैठकीत ते बोलत होते.

विधानसभा निवडणूक खर्च विषयक कामकाजाच्या मार्गदर्शनासाठी निवडणूक खर्च निरीक्षक प्रसांत कुमार काकराला यांच्या अध्यक्षतेखाली १० नोव्हेबर रोजी लातूर येथील शासकीय विश्रामगृहात बैठक संपन्न झाली. या बैठकीस लातूर शहर विधासभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे–विरोळे, जिल्हा खर्च नोडल अधिकारी राजेंद्र नागणे व सर्व विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक खर्च निरीक्षक, खर्च नोडल अधिकारी व्हीव्हीटी, व्हीएसटी पथकांचीही उपस्थिती होती.

खर्च निरीक्षक काकराला प्रसांत कुमार यांनी सर्व उपस्थितांना विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीतील उमेदवारांच्या खर्चाचे अंकेक्षण व्यवस्थित पार पाडण्यासाठी मार्गदर्शन करून व्हिडीओ चित्रीकरण पथकांना सभेतील खर्चाच्या बाबींना केंद्रस्थानी ठेऊन चित्रीकरण कराव्यात व विधानसभेसाठी निश्र्चित केलेल्या दरसूचीचा अभ्यास करावा, अशा सूचनाही यावेळी त्यांनी दिल्या.

## आता चुक केली तर तुम्हाला काळही माफ करनार नाही.... बसवराज पाटील



औसा : चांगल्या कामाला चांगले म्हणायची दानत उजनी गावातील लोकांमध्ये असल्याने त्यांनी गेल्या पंधरा विस वर्षापासुन लोकप्रतिनिधींनी केलेल्या कामाचे मुल्यमापन करणे गरजेचे आहे. माझ्या कार्यकाळात सुरु केलेला विकास आमदार अभिमन्यू पवारांनी आणखीन नेटाने सुरु ठेवला असुन त्यांनी या भागाचा कायापालट करतांना बेरोजगारांना कामाच्या संधी उपलब्ध करुन देत बेलकुंड येथे आडीशे हेक्टरवर येनाऱ्या एमआयडीसीमुळे येथे मोठ मोठे उद्योग येनार आहेत. यामुळे रोजगाराला चालना मिळणार असुन कामाच्या माणसाला निवडण्यात जर तुम्ही चुक केली तर तुम्हाला काळही माफ करणार नसल्याचे माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी म्हटले आहे. रविवारी (दि.१०) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ आयोजीत सभेत ते बोलत होते.

यावेळी व्यासपिठावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, कोळी महासंघाचे अध्यक्ष चैतन्य पाटील, शिवसेनेचे तालुका प्रमुख तानाजी सुरवसे, ॲड. श्रीकांत सुर्यवंशी, काकासाहेब मोरे, सेनेच्या महीला आघाडीच्या सहसंपर्कप्रमुख रंजना कुलकर्णी, अर्जना बिराजदार, प्रविण कोपरकर, हणमंत राचट्टे, संगमेश्र्वर ठेसे, बसवराज धाराशिवे, अरुण मुकडे, डॉ सुभाष ढवण, डॉ बाळासाहेब गंगणे, दिलीप कागे, मजहर पठाण, गिरीराज सोमाणी, काशीनाथ सगट, अण्णाराव सुर्यवंशी, बळीदादा वळके,अण्णाराव सगट आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना बसवराज पाटील म्हणाले की, आम्ही विचार आणि विकासाच्या मुद्यावर एकत्र आलो आहोत. औसा तालुका प्रचंड मागास होता. या तालुक्यात मी आमदार होण्याच्या आगोदर विकासाचा प्रचंड अनुशेष होता. रस्ते, सिंचन, पाणी यावर काम करणे गरजेचे असल्याने मी त्यावर भर दिला. मी केलेल्या विकास कामांना नेटाने आमदार अभिमन्यू पवार पुढे नेत आहेत. त्यांनी रस्ते, पाणी, सिंचन, शेती, उद्योग या बाबत भरीव कामे केली आहेत. माझा ड्रीम प्रोजेक्ट असलेला लातुर–गुलबर्गा रेल्वेमार्ग पवारांनीच दिल्लीत जाऊन मार्गी लावला. मी विरोधात असतांनाही औशाच्या विकासावर त्यांनी माझ्याशी वारंवार चर्चा केली. सल्ला घेतला. यावरुन त्यांच्यामध्ये लपलेल्या खऱ्या लोकप्रतिनीधीची छबी मला दिसली. गेल्या पाच वर्षात त्यांनी या मतदारसंघासाठी केलेली कामे पाहता त्यांना आणखीन संधी देणे गरजेचे आहे. पाहूणा शेजारी सोयरा हे न पाहता काम करनारा लोकप्रतिनिधी निवडला पाहीजे. विकासाच्या मुद्द्यावर लोकांनी पुन्हा एकदा अभिमन्यू पवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी केले पाहीजे असे अवाहन त्यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत ढवण यांनी केले.

यावेळी आमदार अभिमन्यू पवारांनी विरोधी उमेदवाराला अव्हान दिले की . दहा वर्षात तुम्ही काय केले हे सांगा. पाच वर्षात मी काय केले हे सांगतो. विकासावर बोला मी कधीही आपल्या सोबत चर्चा करायला तयार आहे. विरोधी उमेदवाराकडे मुद्दे नसल्याने ते माझ्यावर शिवराळ भाषेचा वापर करीत आपली निष्क्रीयता झाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र तुम्ही जरी शिवराळ भाषा वापरत असाल तरी माझ्यावर चांगले संस्कार झाल्याने मी तुम्हाला थोरला भाऊच म्हणणार आहे असा टोला त्यांनी लगावला. यावेळी उजनी आणि पंचक्रोशीतील आनेक मतदार उपस्थित होते.

## माजलगाव मतदार संघाचे उमेदवार ॲड.महेश लवुळकर यांचा प्रचाराचा झंझावात चालु

माजलगाव (प्रतिनिधी) : माजलगाव मतदार



संघाचे पिपल्स पार्टी ऑफ इंडिया(डेमोक्रॅटिक)चे उमेदवार ॲड.महेश लवुळकर यांचा प्रचार सुरू झाला आहे.माजलगाव मतदारसंघात गावोगावी जाऊन त्यांनी आपले जनमानस बोलुन दाखवला आहे.यावेळी त्यांना गावोगावच्या मतदार बंधु भगिनी यांनी चांगला प्रतिसाद दिला आहे.

माजलगाव मतदारसंघाच्या जनतेने ठरवले आहे की,बदल हवा आमदार नवा हे ब्रीद वाक्य घेऊन येथील जाणता सुजाण नागरिक म्हणून असा बदल करण्याचा मानस मनात बाळगुन जनता यावेळी बदल करण्याचा निर्णय जनतेनेच घेतलेला आहे.यावेळी पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक)चे उमेदवार ॲड.महेश लवुळकर

यांचेसोबत धर्मा मोरे,आतुल चांदमारे,दत्ता मोरे व इतर अनेक सामाजिक चळवळीचे कार्यकर्ते गावोगावी जात आपला वचननामा लोकांना समजावून सांगत प्रचाराचा झंझावात करत आहेत.




## गृह मतदानामध्ये सूक्ष्म निरीक्षकांची भूमिका महत्वाची-निवडणूक सामान्य निरीक्षक डॉ. करुणा कुमारी




लातूर, : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगाने ८५ वर्षांवरील मतदार आणि दिव्यांग मतदारांना गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या अंतर्गत गृह मतदानाचा पर्याय दिलेल्या मतदारांचे मतदान त्यांच्या घरी जावून करून घेतले जाणार आहे. या गृह मतदान प्रक्रियेत सूक्ष्म निरीक्षकांची (मायक्रो ऑब्झर्व्हर) भूमिका महत्वपूर्ण असल्याचे निवडणूक सामान्य निरीक्षक डॉ. करुणा कुमारी यांनी सांगितले. लातूर शहर विधानसभा मतदारसंघातील सूक्ष्म निरीक्षकांच्या प्रशिक्षणाप्रसंगी त्या बोलत होत्या.

उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे– विरोळे, तहसीलदार तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, निवडणूक नायब तहसीलदार अर्चना मैंदर्गी, गृह मतदानाचे नोडल अधिकारी आर. एल. वडगावे यावेळी उपस्थित होते.

गृह मतदानाप्रसंगी गोपनीयतेचा कोणत्याही प्रकारे भंग होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. या अनुषंगाने मतदान पथकाकडून आवश्यक खबरदारी घेतली जात असल्याची सूक्ष्म निरीक्षकांनी खात्री करावी. तसेच भारत निवडणूक आयोगाने गृह मतदानाविषयी दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना डॉ. करुणा कुमारी यांनी यावेळी दिल्या. तसेच सूक्ष्म निरीक्षकांनी भरावयाच्या प्रपत्रांची माहिती दिली.

ईव्हीएम कमिशनिंग कामकाजाची पाहणी

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील ईव्हीएम कमिशनिंगची कार्यवाही पुरणमल लाहोटी शासकीय तंत्र निकेतन येथील सुरक्षा कक्षात सुरु झाली आहे. याठिकाणी निवडणूक सामान्य निरीक्षक डॉ. करुणा कुमारी यांनी भेट दिली. तसेच ईव्हीएम कमिशनिंग कामकाजाची पाहणी केली. लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा भगत यावेळी उपस्थित होत्या.

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# धनशक्ती विरुद्धच्या लढतीत जनतेचा विजय होणार- डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर

लातूर/प्रतिनिधी: लातूर शहर मतदारसंघात धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी लढत होत आहे.ही लढत आता जनतेने हातात घेतली असून या निवडणुकीत जनशक्तीचाच विजय होईल,असे प्रतिपादन भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.



हरंगुळ खु.येथे भव्य पदयात्रेनंतर झालेल्या सभेत डॉ. अर्चनाताई पाटील बोलत होत्या. मंचावर भाजपाचे माजी शहर जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी,बाबू खंदाडे,शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने,विवेकानंद उजळंबकर,केदार पाटील, मीनाताई गायकवाड यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या की, आपण जिंकण्यासाठी लढतोय, विजयासाठी लढतोय.कोणाला पराभूत करण्यासाठी ही लढाई नाही.ही लढाई मी जिंकणारच आहे.तुमच्या विश्र्वासावर माझा विजय होणार आहे. आगामी ८ दिवस तुम्ही माझ्यासाठी द्या, पुढची ५ वर्ष मी तुमच्यासाठी देईन,असेही ताई म्हणाल्या.

डॉ.अर्चनाताई पाटील यांनी सांगितले की,आपला ऊस कारखाना नेणार नाही अशी भीती तुम्हाला असते.पण १२ महिन्याचा ऊस १८ महिन्यानंतर नेला जातो.हा कसला विकास ?यात शेतकऱ्याची काळजी कुठे आहे ? तीन वर्षात केवळ दोन वेळाच तुमचा ऊस जातो.यातून शेतकऱ्यांचे एक वर्षाचे उत्पन्न बुडते.शेतकऱ्यांचे तोंड गोड होत नाही.कारखान्यांची मात्र भरभराट होत आहे.शेतकऱ्यांचे जीवन भकास करण्याचे काम या मंडळींनी केले असल्याचे डॉ. अर्चनाताई म्हणाल्या.

गावातील नागरिकांनी महादेव मंदिराच्या उभारणीसाठी ताईंकडे निधीची मागणी केली होती. त्या अनुषंगाने ताई म्हणाल्या की,मंदिरासाठी तुमचा हक्काचा निधी घ्या.त्यासाठी मला निवडून द्या.प्रश्न अनेक आहेत.त्यांच्या सोडवणुकीसाठी ज्याचे दार सदैव उघडे आहे असा आमदार निवडा,असेही ताई म्हणाल्या.स्मशानभूमीचा प्रश्नही तात्काळ सोडविण्याचे आश्र्वासन त्यांनी दिले.

कमळ हे भाजपचे निवडणूक चिन्ह आहे.विकासाची लक्ष्मी कमळावर बसूनच आपल्या घरात येईल.खोटी आश्र्वासने मी देणार नाही.तुम्ही मागावं आणि मी द्यावं हा सिलसिला कायम सुरू राहील,असेही अर्चनाताई म्हणाल्या.

शैलेश लाहोटी यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांनीच विलासराव देशमुख यांना मुख्यमंत्री पद दिले होते असे सांगितले.मांजरा कारखाना सुरू करण्यासाठीचा परवानाही चाकूरकर यांनीच मिळवून दिला होता.या गोष्टी जाणीवपूर्वक झाकून ठेवण्यात आल्या.आपले आमदार जनतेच्या सुखदुःखात सहभागी होत नाहीत.आता २८ गावांच्या विकासासाठी डॉ. अर्चनाताई पाटील यांना निवडून द्या.२३ नोव्हेंबर रोजी आपण पुन्हा दिवाळी साजरी करू. विजयानंतर डॉ.अर्चनाताई पाटील यांचा २८ गावात दौरा आयोजित करू. ताईंचा पहिला आमदार फंड हरंगुळ खु.या गावाला मिळवून देऊ,असे आश्र्वासनही लाहोटी यांनी दिले.

शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाने यांनी पदयात्रा व सभेला मिळालेला प्रतिसाद ही विजयाची नांदी असल्याचे सांगितले.लातूरला भ्रष्टाचाराचा कॅन्सर झाला असून त्यावर उपचार करण्यासाठी डॉक्टर आमदार हवा,असेही दाने म्हणाले.प्रारंभी मंडळ अध्यक्ष चंद्रकांत खटके यांनी प्रास्ताविक केले.

भव्य पदयात्रा ...

हरंगुळ खु.येथे डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी पदयात्रा काढली.या यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.ताईंनी दुर्गादेवी मंदिर,खंडोबा मंदिर तसेच हनुमान मंदिरात दर्शन घेतले.महात्मा बसवेश्र्वरांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन केले.वाद्यांच्या गजरात निघालेल्या पदयात्रेत गावातील अबालवृद्ध नागरिक, तरुण व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.या यात्रेत ताईंसमवेत शैलेश लाहोटी,बाबू खंदाडे,ड.दिग्विजय काथवटे, मीनाताई गायकवाड,गणेश गवारे,लक्ष्मण झुंजे,केदार पाटील,आनंद राजुळे,तानाजी झुंजे,नंदकुमार झुंजे,विष्णू बडूरे, दैवशाला गावकरे यांनी सहभाग घेतला.

यात्रेदरम्यान ठिकठिकाणी महिलांनी ताईंचे औक्षण केले. संपूर्ण गावात यात्रेवर पुष्पवृष्टी करण्यात आली.ठिकठिकाणी फटाक्यांची आतिषबाजीही करण्यात आली.

तीन वर्षानंतर उसाचं बेणंही बदलतं –लाहोटी

शैलेश लाहोटी आपल्या भाषणात म्हणाले की,तुम्ही ऊस उत्पादक शेतकरी आहात.तीन वेळा उत्पन्न घेतल्यानंतर चौथ्या खेपेस उत्पन्न मिळत नाही म्हणून उसाचे बेणेही बदलले जाते.तसेच लातूरच्या आमदारांनी तीन टर्म पूर्ण केल्या आहेत. चौथ्या खेपेला आता त्यांना बदलण्याची गरज आहे. सलग तीन वेळा जिंकल्यानंतर विलासराव देशमुख यांचाही पराभव झाला होता,अशी आठवणही शैलेश लाहोटी यांनी करून दिली.

# माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचार रॅलीने शहराचा पुर्वभाग महाविकास आघाडीमय माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या विजयाचा आवाज घुमला

लातूर : प्रतिनिधी लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी जनसंपर्क अभियाना अंतर्गत दि. ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी शहरातील २, ३, ४ व ७ या भव्य प्रभागांतून भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीला या चारही प्रभागांतील मतदारांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. पुरुष महिला युवती मोठया प्रमाणात या रॅलीत सहभागी झाले होते. युवकांची संख्या लक्षणिकय होती. प्रभाग क्रमांक ४ मधील बिलाल मस्जिद चौकात माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. तेथून प्रचार रॅलीस सुरुवात तेथून इस्लामपूरा, मदनीचौक, सुफिया मस्जिद, तथागत चौक, हेलन चौक़ प्रभाग ३ मधील तुळजाभवानीनगरपासून रॅलीचा प्रारंभ झाला. जयभीमनगर, इंदिरानगर, राजीवनगर, विवेकानंद चौक, प्रभाग क्रमांक ७ मधील विवेकानंद चौकापासून जिजामाता शाळा, दसरा पार्क, सिद्धार्थ सोसायटी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, मिरकले कॉर्नर, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम चौक ते मचाले, प्रभाग क्रमांक २ मधील मचालेपासून ते कृपासदन चौक, अराफत चौक, पू. अहिल्यादेवी होळकर चौक, संविधान चौक चौकातू प्रचार रॅली एक मिनार चौक चौकात पोचल्यानंतर तेथे रॅलीचा समारोप करण्यात आला.



प्रचार रॅली मार्गावर असंख्य घरांच्या छतावरुन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली, हातात फलक, झेडे घेऊन मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते नागरीक सहभागी झाले होते. लातूर शहराचा पुर्वभाग हा लातूरचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. सोमवारी सायंकाळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या निघालेल्या प्रचार रॅलीने शहराचा पुर्वभाग महाविकास आघाडीमय झाला.युवकांचा सहभाग लक्षणिय होता. 'महाविकास आघाडीचा विजय असो', 'अमित देशमुख तूम आगे बढो हम तुम्हारे साथ है', अशा घोषांचा संपूर्ण परिसरात आवाज घुमला. महिला, युवती, पुरुषही मोठ्या संख्येने प्रचार रॅलीत सहभागी झाले होते.

या प्रचार रॅलीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सुनिल बसपूरे, शेतकरी कामगार पक्षाचे अ‍ॅड़ उदय गवारे, लातूर शहर लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सूळ, माजी नगरसेवक अहेमदखॉ पठाण, माजी नगरसेवक कैलास कांबळे, आसिफ बागवान, माजी माजी नगरसेवक विजयकुमार साबदे, नगरसेवक सचिन बंडापल्ले, माजी नगरसेवक इम्रान सय्यद, माजी नगरसेवक युनूस मोमीन, माजी नगरसेविकास रेहाना तांबोळी, तब्रेज तांबोळी, राजू गवळी, अथरोद्दिन काजी, हकीम शेख, पृथ्वीराज सिरसाठ, अशोक गोविंदपूरकर, प्रा. प्रविण कांबळे, नामदेव इगे, बाबा पठाण, कमल सूरवसे, रघूनाथ मदने, राहूल डूमणे, मोहन सूरवसे, मकबुल वलांडीकर, हरीभाऊ गायकवाड, इस्माईल शेख, विकास कांबळे, नबी नळेगांवकर आदींसह काँग्रेस, काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, आम आदमी पार्टी, महाविकास आघाडीचे माजी नगरसेवक, पदाधिकारी, नागरिक, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

असंख्य ठिकाणी जेसीबीद्वारे फुलांची उधळण माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचार रॅलीच्या प्रारंभीच हजारोंच्या संख्येत तिरंगी झेंडे घेऊन सहभागी झाले होते. रॅलीची सुरुवात फुलाच्या उधळणीने झाली. मदनी चौकात अहेमदखॉ युवा मंचच्या वतीने जेसीबीद्वारे भल्या मोठ्या फुलांच्या हाराने माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे स्वागत करण्यात आले. जेसीबीतून फुलांची उधळण करण्यात आली.

रॅली तथागत पोचल्यानंतर तेथे पप्पूजी गायकवाड मित्र मंडळाच्या वतीने भव्य दिव्य स्वागत करण्यात आले. तुळजाभवानीनगरात मुळे परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात आले. प्रभाग क्रमांक ३ मध्ये काँग्रेसचे कार्यकर्ते राजू गवळी यांच्या वतीने स्वागत करण्यात आले.रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पोचल्यानंतर तेथे अ‍ॅड़ आतिश चिकटे यांच्या वतीने फुलांचा मोठा हार घालून माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे स्वागत करण्यात आले.जागोजागी महिला भगिणींनी औक्षण करुन माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांना आशिर्वाद दिला.

## महाविकास आघाडी सरकार पाडणाऱ्यांना धडा शिकवा धिरज विलासराव देशमुख यांचे आवाहन

लातूर प्रतिनिधी – राज्यात द्वेषाचे राजकारण करणारे भाजप



सरकार नको म्हणून आम्ही महाविकास आघाडीच्या माध्यमातून जनतेला पर्यायी सरकार दिले होते. मात्र केंद्रातील अदृश्य शक्तीच्या माध्यमातून षडयंत्रकरून यांनी आमचे सरकार पाडले. त्यानंतर न्यायालयानेही निकाल दिला नाही. मात्र आता जनतेने लोकसभे प्रमाणे विधानसभेला यांना धडा शिकवून न्याय द्यावा असे आवाहन महाविकास आघाडी काँग्रेसचे उमेदवार धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रचारासाठी काँग्रेस उमेदवार आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी सोमवारी टेंबी , येल्लोरवाडी , वरवडा , रिंगणी या गावांना भेट दिली. त्यावेळी त्यांनी महायुती सरकारवर सडकून टीका केली.

धिरज देशमुख म्हणाले की, जनतेने लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना धडा शिकवला आहे. विधानसभा निवडणुकीतही जनता महाविकास आघाडीच्या मागे आहे .त्यामुळे जिल्ह्यात महाविकास आघाडीचे सर्व आमदार बहुमताने विजयी होतील. तसेच आता जिल्ह्यात महाविकास आघाडीच्या उमेदवारांपैकी सर्वाधिक लीड कोण घेणार अशी स्पर्धा लागली असल्याचेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. मांजरा परिवाराच्या माध्यमातून साखर कारखान्यामध्ये भाव देण्याची स्पर्धा ज्याप्रमाणे लागते, तशी स्पर्धा आता मतदारसंघातील उमेदवारांमध्ये लागल्याचे दिसून येत असल्याचेही मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

महाविकास आघाडीची पंचसूत्री लोकहिताची–

दरम्यान या गाव भेटी दौऱ्यावेळी धिरज देशमुख यांनी महाविकास आघाडीच्या पंचसूत्री बद्दल जनतेला माहिती दिली. महालक्ष्मी योजनेच्या माध्यमातून आम्ही महिलांना तीन हजार रुपये देणार आहोत. येणाऱ्या काळामध्ये लाडकी बहीण महालक्ष्मीच्या रूपाने येणार आहे. तसेच महविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यावर महिलांना बसचा प्रवास मोफत करण्यात येणार आहे. प्रत्येक कुटुंबाला पंचवीस लाख रुपये आरोग्य संरक्षण विमा असेल, शेतकऱ्यांना तीन लाख रुपये कर्जमाफी, युवकांना रोजगार, जातीय जनगणना असे सर्वसमावेशक लोकहिताचे निर्णय महाविकास आघाडी सरकार पंचसूत्रीच्या माध्यमातून घेणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात पुन्हा एकदा जनहिताचे सरकार आणण्यासाठी महाविकास आघाडीला साथ द्या. त्यासाठी येणाऱ्या २० तारखेला १ एक नंबर क्रमांक समोरील हाताच्या चिन्हाचे बटन दाबून बहुमताने विजयी करा, असे आवाहनही धीरज देशमुख यांनी यावेळी केले.

# भाजपा कार्यकर्त्याने घ्यावी तीन घरांची जबाबदारी!

मुंबई : विधानसभा निवडणूक ही कुण्या एका उमेदवाराच्या भाग्याची नसून महाराष्ट्राच्या विकासाची जबाबदारी निश्र्चित करणारी आहे. महायुती सरकार आणण्यासाठी भाजपाच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी तीन घरांची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष श्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. महाराष्ट्राच्या विकासासाठी जनता पुन्हा एकदा भाजपा – महायुतीचे सरकार आणणार असल्याचा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.



नागपूर जिल्ह्यातील काटोल विधानसभा मतदारसंघाचे भाजपा–महायुती उमेदवार चरणसिंग ठाकूर यांच्या प्रचारार्थ काटोल आणि मोवाड, सावनेर विधानसभा क्षेत्रातील भाजपा–महायुतीचे उमेदवार डॉ. आशिषराव देशमुख यांच्या प्रचारार्थ कळमेश्र्वर आणि हिंगणा विधानसभा क्षेत्राचे भाजपा–महायुती उमेदवार समीर मेघे यांच्या प्रचारार्थ रायपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह जनसभा घेतल्या. श्री बावनकुळे यांनी काटोल विधानसभा क्षेत्रात सतरंजी संघटनेने भाजपा उमेदवार चरणसिंग ठाकूर यांना पाठिंबा जाहीर केल्याची माहिती दिली. कळमेश्र्वर येथील सभेत काँग्रेस नेते सुनील केदार यांच्यावर टीका केली. ते म्हणाले, बँकेत घोटाळा केल्याने त्यांना कोर्टाने शिक्षा दिली. यामुळे त्यांना आता ६ वर्षे निवडणूक लढता येत नाही. त्यांनी कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली नाही. त्यांचा कार्यकर्त्यांवर विश्र्वास नाही. हिंगणा मतदारसंघाच्या उत्तम भविष्यासाठी समीर मेघे यांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

प्रचार सभामंध्ये नितीन गडकरी, चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मध्यप्रदेशच्या खासदार मायाताई मरोलिया, डॉ.राजीव पोतदार, माजी आमदार अशोक मानकर, राजेश जीवतोडे, अशोक धोटे, प्रकाश टेकाडे, अविनाश ठाकरे, किरण पांडव, सुबोध मोहिते, उकेश चौहान, राजू हरणे, इस्माईल बारूदवाले, संतोष पारेख, किशोर रेवतकर, दिनेश ठाकरे, सुरेश खसारे, शामराव बारई, मनोज कोरडे, पार्वतीबाई काळबांडे, किशोर रेवतकर, दिनेश ठाकरे, वैशालीताई ठाकूर, विजय महाजन, डॉ. बी. एन. भुतडा, पुरुषोत्तम धोटे, नरेंद्र डोंगरे, मीनाक्षीताई सरोदे, पुष्पाताई चापले, रमजान अन्सारी, रोहित मुसळे यांच्यासह मोठ्या संख्यने भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ भगवंत खुब्बा यांची आज लातुरात सभा आ.निलंगेकर,आ.पवार, आ.कराड,बसवराज पाटील यांचीही उपस्थिती

लातूर/प्रतिनिधी:लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ मंगळवारी (दि.१२)सायंकाळी हनुमान चौक येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या सभेस माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार,आ.

रमेशअप्पा कराड,माजीमंत्री बसवराज पाटील मुरूमकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

लातूर शहर मतदारसंघात महायुतीच्या उमेदवार डॉ.

अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे.ताईंच्या भेटीगाठी, पदयात्रा,कॉर्नर बैठका आणि सभांना मोठी गर्दी होत आहे. मतदार डॉ.अर्चनाताईंना समर्थन देत आहेत.प्रचार मोहिमेने गती घेतली असून आता जाहीर सभांचे आयोजन केले जात आहे.

या अंतर्गत मंगळवारी दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता हनुमान चौक येथे सभा होणार आहे.माजी केंद्रीय मंत्री भगवंत खुब्बा हे या सभेस मार्गदर्शन करणार आहेत.माजी मंत्री आ.संभाजीराव पाटील निलंगेकर,आ.अभिमन्यू पवार, आ.रमेशअप्पा कराड,माजी मंत्री बसवराज पाटील मुरूमकर, उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर,भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,

शिवसेना नेते ड.बळवंत जाधव,जिल्हा प्रमुख सचिन दाने,राष्ट्रवादीचे मकरंद सावे,प्रशांत पाटील,रिपाइंचे डी.ई. सोनकांबळे यांच्यासह महायुतीतील पक्षांच्या नेत्यांची या सभेस प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या सभेस भाजपा व महायुतीचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि नागरिक व मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना पाठबळ व्यक्त करावे,असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## आरक्षण टिकवायचे असेल तर ओबीसी उमेदवारांना निवडुन द्या- अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर

माजलगाव (प्रतिनिधी) : भाजप आणि काँग्रेस हे दोन्ही आरक्षणाच्या विरोधात असून आरक्षण म्हणजे मानसन्मान आहे. तो कायम टिकवायचा असेल तर विधानसभेत जास्तीत जास्त ओबीसी उमेदवार पाठवा,असे मत आयोजित सभेत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले. आरक्षणयात्रा मी काढून आरक्षणाच्या हक्काची जागृती केली.भाजपने आरक्षणा विषयी आपली भूमिका स्पष्टपणे व्यक्त करावी. ओबीसीतुन कसे आरक्षण देता येईल,याची स्पष्ट ग्वाही भाजपने द्यावी.भाजप असेल किंवा काँग्रेस असेल यांनी किती ओबीसी नेतृत्वाला संधी दिली,यांची देखील पोलखोल करत आरक्षण हे धोक्यात आणण्याचे काम हे पक्ष करत असल्याची भावना व्यक्त करत जर आरक्षण वाचवायचे असेल तर १०० ओबीसी उमेदवार विधानसभेत गेले पाहिजेत.जेणेकरून ताकद निर्माण होईल आणि ही ताकद फक्त वंचित बहुजन आघाडीत असून पाठीशी उभा राहण्याचे आवाहन यावेळी अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांनी केले.शहरातील मोंढा मैदानात सभेचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मोठ्या प्रमाणावर अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांचे विचार ऐकण्यासाठी नागरिकांची आणि महिलांची उपस्थिती मोठ्याप्रमाणात होती.आरक्षण हा आपला आत्मा आहे आणि हीच ती वेळ आहे.आपलं आरक्षण टिकण्यासाठी एकजुट होण्याची.त्यामुळे आपला आत्मा कायम राहण्यासाठी आपली जवाबदारी प्रत्येकाने पार पाडावी,असेही मत अ‍ॅड.प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केले.

### भविष्यातील लातुरसाठी एकमेकांच्या साथीने काम करू – डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांचा विश्वास

लातूर/प्रतिनिधीःलातुरला शैक्षणिक हब,उद्योग नगरी तसेच स्वच्छ व सुंदर करण्यासाठी खूप काम करण्याची आवश्यकता आहे. आपली माझ्याकडून तशी अपेक्षाही आहे.एकमेकांच्या साथीने आपण सर्वजण प्रयत्न करून भविष्यातील लातूर घडवू,असा विश्वास भाजपा महायुतीच्या लातूर मतदार संघातील उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी दिला. शहरातील सीए,व्यापारी व बिल्डर्स असोसिएशनच्या वतीने विष्णूजी की रसोई गार्डन येथे आयोजित संवादात डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर बोलत होत्या.यावेळी सुबोध बेळंबे,किरण मंत्री,रुशिकाताई पाटील चाकूरकर,राहुल धरणे, जगदीश कुलकर्णी,सीए आनंद बारपुते,सुशील बेळंबे,श्रीकांत बेळंबे यांच्यासह शैलेश गोजमगुंडे,संतोष हत्ते, कुशाग्रसिंह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी सीए,व्यापारी व बांधकाम व्यावसायिक यांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना एअर कनेक्टिव्हिटी असायला हवी. आयटी हब असल्यामुळे बेंगलोर आणि दिल्लीची कनेक्टिव्हिटी असावी.लातुरची आयटी हब म्हणून ओळख निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करण्याच्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.आतापर्यंत आम्ही जाहीरनामे पाहून मतदान केले.आता आपले काम पहायचे आहे,अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली होती.

हाच धागा पकडत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मनोगत व्यक्त करताना उपस्थितांच्या मनातील सर्व शंकांचे निरसन करत भविष्यातील नियोजनाबाबत त्यांना आश्र्वस्त केले.डॉ. अर्चनाताई म्हणाल्या की, लातुरमधील व्यापारी व व्यावसायिक अजूनही उघडपणे बोलत नाहीत.आपण मला बोलावून हा कार्यक्रम आयोजित केला,आपल्या भावना मांडल्या त्याबद्दल आपले कौतुकच करायला हवे.डॉ.अर्चनाताई म्हणाल्या की,कुठलाही प्रश्र्न सोडविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती असणे गरजेचे असते. आतापर्यंत आपण जाहीरनामे पाहूनच मतदान केले. माझ्याकडून मात्र अपेक्षा व्यक्त करत आहात. पण आव्हाने स्वीकारणे हा माझा स्वभावच आहे.कमी बोलून अधिक काम करणे ही माझी सवय आहे. त्यामुळे कुठलाही शॉर्टकट न वापरता मी लातूरसाठी काम करत राहणार असल्याचे डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या. आपणा सर्वांचा उद्देश एकच आहे.लातूरचे भविष्य आपल्या डोळ्यासमोर आहे. पारदर्शक कारभाराच्या माध्यमातून आपण लातूरला उद्योग नगरी बनवू. आयटी हब बनवण्यासाठी काम करू.लातूर शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी काम करू. त्यासाठी आपल्या सर्वांच्या मदतीची गरज आहे.

# लातूरला मिळाले एक विरंगुळा केंद्र,, नागरिकांना नवीन आकर्षण, उद्यानात लातूरकराना निसर्गाचा आनंद, उद्यान शहराच्या सौंदर्यात भर घालणार

लातूर शहरातील प्रभाग ८ मधील महात्मा गांधी मार्केट येथे सर्व सोयीसुवीधायुक्त उद्यान सेवेत सुरू झाले आहे. या उद्यानाच्या माध्यमातून लातूरकरांना नवीन विरंगुळा केंद्र मिळाल आहे. या उद्यानात लातूरकरांना निसर्गाचा आनंद घेता येणार आहे. तसेच, हे उद्यान शहराच्या सौंदर्यात भर घालणारे झाले आहे.





लातूर शहरातील विशेषता महात्मा गांधी मार्केट येथील व्यापारी, विदयार्थी आणि नागरीक यांनी ही जागा दुर्लक्षित असून या जागेवर सुशोभीकरण व्हावे अशी मागणी केली होती. तेथे उद्यानाची निर्मिती करण्यासाठी सुमारे ८० लाख २५ हजार रुपयांच्या निधी मंजूर करण्या करीता पुढाकार केला.

उद्यानाच्या माध्यमातून अभिनव उपक्रम

लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी उद्यानाच्या माध्यमातून अभिनव उपक्रम साकारला आहे. उद्यानात लहान मुलांसाठी हिरवळीवर खेळण्यासाठी लॉन तयार करण्यात आला आहे. तसेच, विरंगुळा म्हणून फिरण्यासाठी जॉगिंग ट्रॅक, चालण्यासाठी वॉकिंग ट्रॅक करण्यात आले आहे. व्यापारी, नागरीक, प्रवासी यांना निवांतपणे बसण्यासाठी विसावा व्यवस्था करण्यात आली आहे. दुपारच्या वेळी भोजन करण्यासाठी व विश्रांतीसाठी मोकळी जागा विश्रांतीगृह (डायनींग एरिया) आहे. कौटुंबिक छोटेखानी कार्यक्रम करता यावेत यासाठी सुवीधा केली आहे.

**विविध फुलझाडे आणि वृक्ष लागवडीमुळे उद्यानाला एक वेगळीच ओळख**

उदयानात अदययावत सुवीधेसह सुशोभीकरण करण्यासाठी विविध प्रकारची फुल झाडे आणि वृक्ष लावण्यात आले आहेत. यामध्ये गुलाब, चाफा, मोगरा, रातराणी फुलझाडे आहेत तर कडेनी बांबू लावण्यात आले आहेत. उद्यानातील सुशोभीकरणामुळे परिसराची देखील शोभा वाढली आहे. उदयानाची देखभाल करण्यासाठी आवश्यक पाण्यासाठी विंधन विहीर (बोअर) घेवून पाण्याची व्यवस्था केली आहे.

उद्यानातील फुलझाडांची मोहिनी, गुलाबाचा मोहक सुगंध, चाफ्याची शांत सुगंध, मोगऱ्याचा आणि रातराणीची सुगंध या उद्यानाला एक वेगळीच ओळख निर्माण करून देत आहे.

येथे येणाऱ्यासाठी स्वच्छता गृह, पाण्याची व्यवस्था आहे. उदयानाचा वापर करता यावा यासाठी हेरीटेज लाईटचा वापर करून आकर्षक विद्युत रोषणाई केली आहे. सुरक्षा रक्षकासाठी केबीन सुवीधा असून सर्व मुलभूत सुविधा दर्जेदार उभारण्यात आल्या आहेत. यामुळे उदयान पाहता क्षणी मनमोहक स्थळ म्हणून पसंतीस पडेल असे ठिकाण झाले आहे.

लातूर शहरात अभिनव प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाचे वास्तु विशारद पुणे येथील नामांकित श्री महेश नामपुरकर आहेत तर या प्रकल्पाचे बांधकाम काम अभिजीत इगे यांनी पूर्ण केले आहे. या अभिनव उपक्रमाचे लातूर शहरातील व्यापारी, परिसरातील नागरिक यांच्याकडून कौतूक होत आहे.

**लातूरला मिळाले सुंदर उद्यान, नागरिकांना नवीन आकर्षण**

लातूर शहरातील महात्मा गांधी मार्केट परिसरात एक सुंदर उद्यान उभारण्यात आले आहे. या उद्यानाने शहराच्या सौंदर्यात भर घातली असून, नागरिकांना एक नवीन विरंगुळाचे ठिकाण मिळाले आहे.

**निसर्गाचा आनंदः**

या उद्यानात लॉन, जॉगिंग ट्रॅक, वॉकिंग ट्रॅक, विश्रांतीगृह आणि मुलांच्या खेळण्यासाठी जागा उपलब्ध आहे. विविध प्रकारची फुलझाडे आणि वृक्षांची लागवड करण्यात आली असून, उद्यानात फिरताना नागरिकांना निसर्गाचा आनंद घेता येईल.

शहराच्या विकासातील महत्त्वपूर्ण पाऊलः

लातूर शहरातील व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी या जागेवर उद्यान उभारण्याची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीला अनुसरून, सुमारे ८० लाख रुपये खर्चून हे उद्यान तयार करण्यात आले आहे. हे उद्यान शहराच्या विकासातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.

**नागरिकांची प्रतिक्रियाः**

या उद्यानाचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन झाल्यापासून नागरिकांचा याकडे मोठा प्रतिसाद मिळत आहे. विशेषतः मुले आणि वृद्धांना हे उद्यान खूप आवडत आहे. उद्यानात येऊन नागरिक निवांत वेळ घालवत आहेत.

## राशीभविष्य १२ नोव्हेंबर २०२४

मेषः शुभ रंगःपिवळा, शुभ दिशाः पूर्व

आपल्याला नवीन संधी मिळतील. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. कार्यक्षेत्रात प्रगती होईल. दुसऱ्याच्या कामात हस्तक्षेप करू नका. प्रवास सुखकारक राहील.

वृषभ : शुभ रंगःकेसरी, शुभ दिशाःउत्तर

नवीन कामाशी संबंध येण्याचा योग आहे. कोणत्याही काम ात स्पर्धक म्हणून राहण्यातच आपला फायदा आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

मिथुनः शुभ रंगः केसरीः शुभ दिशाःउत्तर

वेळेत कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. मित्रांचे व सगे सोयऱ्यांचे सहकार्य मिळेल. निष्कारण वाद विवाद, तणाव टाळला पाहिजे. व्यापाराती योग्य निर्णय फायदेशीर राहील.

कर्क :शुभ रंगःपांढरा, शुभ दिशाःपश्चिम

मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांचे प्रेम मिळेल. व्यापारात नवीन योजनाचा शुभारंभ होईल. आपल्या व्यसनांना चालना देऊ नका.

सिंह : शुभ रंगः गुलाबी, शुभ दिशाःउत्तर

जोखमीचे व जबाबदारीचे कामे सावधतेने करा. निष्कारण धावपळ करू नका. प्रयत्न करून आज यश कमी मिळेल. कौटुंबिक समस्यांची चिंता राहील.

कन्या :शुभ रंगःहिरवा, शुभ दिशाःपश्चिम

अति उत्साह आपल्याला नुकसान पोहचवेल. प्रवासाचा फायदा होणार नाही. अधिक खर्च करण्याची प्रवृत्ती सोडा. व्यापार मध्यम राहील.

तुळः शुभ रंगः जांभळा, शुभ दिशाः पूर्व

कौटुंबिक वातावरण आनंदी असल्यामुळे आपले कामात लक्ष लागेल. सामाजिक प्रतिष्ठेत वाढ होईल. पैशाच्या बाबतीत असलेली चिंता दूर होईल. वहान चालवतांना सावधानी बाळगली पाहिजे.

वृश्चिकः शुभ रंगःकेसरी, शुभ दिशाःपूर्व

मुलांच्या कार्यक्षेत्रातील शुभ बातम्या प्राप्त होतील. नौकरीमध्ये अधिकारी आपल्याला सहकार्य करतील. घाई गडबडीने कोणतेही काम करू नका.

धनुः शुभ रंगःपिवळा, शुभ दिशाः पूर्व

कौटुंबिक संबंध मधूर राहतील. मान सन्मान वाढेल. भागीदारीचे अनेक नवीन प्रस्ताव मिळतील. अनोळखी व्यक्तीपासून सावध रहा. अडकलेला पैसा मिळेल.

मकर :शुभ रंगःपिवळाः शुभ दिशाःपश्चिम

आपली दयाळू प्रवृत्ती, उदारतेमुळे आपल्याला एक नवीन सुख देऊन जाईल. नवीन पद मिळण्याची शक्यता आहे. गुंतवणूकीच्या बाबतीत जागृत रहा. मुलांचे जीवन समाधानी राहील.

कुंभः शुभ रंगःपिवळा, शुभ दिशाःउत्तर

मन उत्साही राहिल्यामुळे आजचा दिवस चांगला जाईल. लांब रहात असलेल्या नातेवाईकांकडून फायदा मिळेल. व्यापार चांगला चालेल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

मीन :शुभ रंगः पांढरा, शुभ दिशाःउत्तर

जीवनसाथीचे सहकार्य आपल्याला मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील. प्रतिष्ठीत लोकांच्या भेटीमुळे आपल्या फायद्यात वाढ होईल. प्रवासात सावधानी बाळगा.

# जातीवादी शक्तींना रोखण्यासाठी मोहनराव जगताप यांना विजयी करा - विवेक पोटभरे

माजलगाव (प्रतिनिधी)जातीवादी शक्तींना रोखण्यासाठी मी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे उमेदवार मोहनराव जगताप यांना पाठिंबा देत आहे.आपण सर्वांनी मोहनराव जगताप यांना विजयी करण्यासाठी प्रयत्नांची पराकष्ठा करावी, असे प्रतिपादन विवेक पोटभरे यांनी युवकांच्या घेतलेल्या विराट मेळाव्यात केले.आज विवेक पोटभरे मित्र मंडळाने महाविकास आघाडीचे उमेदवार मोहनराव जगताप यांना जाहीर पाठींबा देण्यासाठी युवकांचा विराट मेळावा केशवराज मंगल कार्यालयात घेतला.



मोहनराव जगताप यांच्या नेतृत्वावर विश्र्वास ठेवून केशवराज मंगल कार्यालय येथे माजी नगरसेवक विवेक पोटभरे आणि त्यांच्या मित्र मंडळाने आज जाहीर पाठिंबा दिला.या पाठींबायामुळे मोहन जगताप यांची वाटचाल विजयाच्या दिशेने होत असल्याचे दिसत आहे.

यावेळी व्यासपीठावर मोहनराव जगताप, राष्ट्रवादी प्रदेश सचिव दयानंद स्वामी,नितीनराव नाईकनवरे,नारायणराव डक,भाई गंगाभीषण थावरे,सहाल चाऊस,नारायणराव गोले,श्रीहरी काळे,दत्ता कांबळे,कॉ.मुदस्सीक बाबा सर,कॉ. मोहन जाधव,महावीर मस्के,शुभम डाके,कचरू खळगे,संतोष यादव सह महाविकास आघाडीचे सर्व पक्षीय पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी मान्यवराची समायोचित भाषणे झाली.

विवेक पोटभरे हे बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक बाबुराव पोटभरे यांचे पुतणे असुन पोटभरे यांच्या तालमीत ते तयार झाले असुन युवक वर्गावर त्यांचा चांगला प्रभाव आहे.दलित समजातील युवा नेतृत्व म्हणुन पुढे आले आहे. याचा मोठा फायदा जगताप यांना होणार आहे. जगताप यांच्या बेरजेच्या राजकारणामुळे त्यांची वाटचाल विजयाकडे होत आहे.

## इतिहासात आजचा दिवस १२ नोव्हेंबर २०२४

अंतरराष्ट्रीय

१९४२ – ग्वाडालकॅनालजवळ पहिले नाविक युद्ध सुरू.

१९४४ – ब्रिटिश विमानांनी ५५०० किलो (१२ हजार पाँड) वजनाचा बॉम्ब टाकून 'टिर्पिझ' ही जर्मन युद्धनौका बुडवली. ही घटना दुसऱ्या महायुद्धात गाजली.

२००७ – वादळामुळे यूक्रेनच्या काळ्या समुद्र किनाऱ्यावर एक रशियन तेलवाहू जहाज बुडून त्यातील १३०० टन तेल पाण्यात मिसळले.

राष्ट्रीय

१९३० – पहिली गोलमेज परिषद सुरू.

१९५२ – युनेस्कोच्या अध्यक्षपदी सर्वपल्ली राधाकृष्णन यांची निवड.

१९६९ – काँग्रेस अध्यक्ष निजलिंगप्पा यांनी इंदिरा गांधी यांना पक्षातून हाकलले.

२००६ – जम्मू येथील स्थानिक न्यायालयाने पाकिस्तानच्या आयएसआय या गुप्तचर संस्थेच्या इशाऱ्यावर काम करणाऱ्या चार दहशतवाद्यांना साडेबावीस वर्षांच्या कठोर कारावासाची शिक्षा सुनावली.

२००७ – दक्षिण भारतात सत्ता स्थापन करण्याचे भाजपाचे कित्येक वर्षाचे स्वप्न पूर्ण झाले. कर्नाटकाचे राज्यपाल रामेश्वर ठाकूर यांनी एका दिमाखदार सोहळयात भाजपाचे नेते बी.एस.येदीयुरप्पा यांना मुख्यमंत्री पदाची शपथ दिली.

२००७ – भारत व रशियाने सामरिक संबंधांना नव्या उंचीवर नेत बहुद्देशीय लढाऊ विमानाचा विकास व उत्पादनात सहकार्याच्या करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

२००७ – मोबाईल सेवा देणारी कंपनी कुठलीही असो, आपल्या मोबाईलचा नंबर तोच राहाणार असल्याचा निर्णय ट्रायने दिला.

२००८ – आंध्र प्रदेश व ओरीसाच्या समुद्र किनाऱ्यावर अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता असलेल्या के–१५ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

जन्म

१८४० – ऑगस्ते रोट्टँ, कलाकार.

१८४२ – जॉन रॅले, १ अरगॉन या निष्क्रिय वायूचे संशोधक.

१८७९ – सर सी.पी. रामस्वामी अय्यर, विद्वान भारतीय.

१८८० – सेनापती बापट, सशस्त्र क्रांतिकारक व समाजसेवक.

१८९६ – डॉ. सलीम मोईनुद्दीन अब्दुल अली, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षितज्ज्ञ.

१९०५ – एस.एम. जोशी, ज्येष्ठ समाजवादी नेते.

१९४४ – रावसाहेब कसबे, दलित साहित्यिक.

निधन

१८६५ – एलिझाबेथ क्लेगहॉर्न गास्केल, लेखिका.

१९४६ – पं. मदन मोहन मालवीय, बनारस हिंदू विद्यापीठाचे निर्माते.

१९५९ – सेवानंद बाळूकाका कानिटकर तसेच बहुजन समाजाचे नेते केशवराज जेधे यांचे निधन.

# श्रीजयाच्या रुपाने भोकर मतदार संघाला मिळालेल्या विकासाच्या वारशाला साथ द्या - मा. मंत्री आमदार पंकजा मुंडे

भोकर/ सिद्धार्थ जाधव/महाराष्ट्रासह देशाच्या राजकारणातील डॉ.शंकरराव चव्हाण, गोपीनाथ मुंडे या दोन मोठ्या नेत्यांना कुठलाही राजकीय वारसा नसला तरी ते पक्षाच्या कक्षा बाहेर जाऊन निरागसपणे राजकारणातून समाजकारण व समाजाची सेवा ही आपल्या राजकारणाचा भाग समजून ते अविरत समाजकार्य करत राहिले. मागील सत्तर वर्षाच्या काळात काँग्रेस सरकारने जे करू शकले नाही ते भाजप महायुतीच्या सरकारने प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशातील शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना, महिलांसाठी लाडकी बहीण योजना, सुशिक्षित युवकांसाठी लाडका भाऊ योजना, वयोवृद्ध महिला पुरुषांसाठी वयोश्री योजना अशा विविध योजना राबवून देशाला शक्तिशाली बनवण्याचे काम महायुती सरकारने केले. अशा दूरदृष्टी असलेल्या नेत्यांचा विकासाचा वारसा जपण्यासाठी भाजप महायुतीच्या भोकर विधानसभा मतदारसंघाच्या अधिकृत उमेदवार मराठवाड्याचे विकास पुरुष डॉ. शंकरराव चव्हाण यांची नात व मा. मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण व नांदेड लोकसभा मतदारसंघाचे अधिकृत उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांना प्रचंड मताने विजयी करा आणि भाजप महायुतीचे हात बळकट करा असे आवाहन यावेळी केले.



भोकर विधानसभा मतदार संघाच्या भाजप महायुतीच्या अधिकृत उमेदवार श्रीजया अशोकराव चव्हाण यांच्या प्रचारार्थ दिनांक ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ३ वाजता मोंढा मैदान येथे जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मा. मंत्री आमदार पंकजा मुंडे यावेळी बोलताना म्हणाले.

यावेळी मा.मंत्री आमदार पंकजा मुंडे, मा.आमदार अमर राजूरकर, पोहरादेवी येथील आमदार बाबूसिंह महाराज, तेलंगणातील आमदार रामराव पाटील,मध्यप्रदेश मधील आमदार नेहा बंशाल,सचिन साठे, गोल्ला गोलेवार यादव समाज प्रदेशाध्यक्ष नामदेवराव आयलवाड, मा. जि प अध्यक्ष मंगाराणी अंबुलगेकर डॉ. राम नाईक,चैतन्य बापू देशमुख ,रोहिदास राठोड, मारोतराव कवळे गुरुजी, प्रवीण गायकवाड, बाबुराव सक्करगे सायाळकर, कल्पना भोसले, व्यंकटेश साठे, माजी नगरसेवक डॉ.मनोज गिमेकर, शहराध्यक्ष विशाल माने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सूत्रसंचालन संचालक रामचंद्र मुसळे तर उपस्थितांचे आभार भोकर तालुका प्रभारी समन्वयक भगवान दंडवे यांनी मानले.

भोकर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष लक्ष देणार– श्रीजया अशोकराव चव्हाण

या जाहीर सभेस जमलेली गर्दी ही चव्हाण कुटुंबीयांवर प्रेम करणारी आहे. इथे जमलेल्या जनसमुदायातील प्रत्येक जण माझ्या कुटुंबातला सदस्य आहे. हि कुटुंबातील सदस्य आज मला आशीर्वाद देण्यासाठी आली आहे.भोकर मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी मी माझ्या आजोबा आई–वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून मतदार संघातील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद शाळेतील चांगले व दर्जेदार शिक्षण, सुशिक्षित बेरोजगारांसाठी रोजगार, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यासाठी विशेष लक्ष देणार आहे. भोकर विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी मी विधानसभेत येथील मतदारांसाठी वकील म्हणून आवाज उठवणार आहे. यासाठी आपल्या सर्वांचा मला व चव्हाण कुटुंब यांना आपल्या आशीर्वादाची आज गरज आहे.

भोकर मतदार संघातील सुशिक्षित बेरोजगांसाठी उद्योग उभारायचे आहेत.

भोकर मतदार संघात इतर नेते बिनकामी गप्पा मारतील, आपली दिशाभूल करतील पण आपण त्यांच्या भूलथापांना बळी न पडता महायुती सरकारच्या काळात भोकरच्या विकासाचा इतिहास घडवायचा असेल तर माझ्या धैर्याला व विकासाला साथ द्या , भाजप महायुतीच्या कमळाला मत द्या असे आव्हान यावेळी केले.

यावेळी मध्यप्रदेश मधील आमदार नेहा बंशाल, तेलंगणातील आमदार रामराव पाटील,आमदार बाबूसिंह महाराज,सचिन साठे, मारोतराव कवळे आदींनी याप्रसंगी आपले विचार व्यक्त केले.

### काँग्रेसचे आमदार निष्क्रिय असल्यानेच काकाला गॅरंटी घेण्याची दुर्दैवी वेळ आली - आ. रमेशआप्पा कराड

लातूर – मतदार संघात कोणतेच काम केले नाही जनतेच्या सुखदुःखात सहभागी झाले नाहीत काँग्रेसचे आमदार निष्क्रिय आहेत हे मतदारांनी ओळखून घेतले आहे यावेळी कोणत्याही परिस्थितीत काँग्रेसचा पराभव होणार असल्याने सहकार महर्षी काकांना प्रचार बैठकीत विकास कामासाठी आमदाराची गॅरंटी घेण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. काँग्रेसवाल्यांनी कितीही धनशक्तीचा वापर केला तरी जनशक्तीचाच विजय होणार असल्याचे महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी)
RNI No.: - MAHMAR/2017/72894